# कलम १९ अधिसूचना

क्र.कावि/अका/भुसं/१६९६/२०१९
उपविभागिय अधिकारी खामगांव
यांचे कार्यालय दि. 23/12/२०१९

क्रमांक:-भुसंप्रक्र.एलएक्यु/आरडी-८/शेगांव/पुरवणी/०१/२०१८-१९ मौजा-शेगांव ता. शेगांव जि. बुलडाणा

ज्या अर्थी समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ ( २०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक ९९२/२०१९ दिनांक २६/०६/२०१९ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसुचित अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बुलडाणा ( जिल्हयाच्या ) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे या बाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम ( १ ) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे या व्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारीत केले असल्याचे या व्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसुची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड ( छ ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी , उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागिय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी खामगांव यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-RD-८ (पुरवणी)

जमिनीचे वर्णन

गांव- शेगाव तालूका- शेगांव जिल्हा - बुलडाणा

| अ.क्र. | नझुल शिट नंबर | प्लाट क्रमांक | संयुक्त मोजणी अंती संपादीत होणारे सत्ता प्रकारा प्रमाणे बांधकाम क्षेत्र चौ.मी. | | संयुक्त मोजणी अंती संपादीत होणारे सत्ता प्रकारा प्रमाणे खुले जागेचे क्षेत्र चौ.मी. | | संपादन करावयाचे एकुण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ए | बी | ए | बी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २१ डी | १२३ पैकी | ६.२७ | ० | - | - | ६.२७ |
| २ | २१ डी | १२३ पैकी | १०.३५ | ० | - | - | १०.३५ |
| ३ | २१ डी | ८०, ८१/२ पैकी | ० | १०.०० | - | - | १०.०० |
| ४ | २१ डी | १३८ | १.२५ | ० | - | - | १.२५ |
| | | **एकुण** | **१७.८७** | **१०.००** | | | **२७.८७** |

**एकुण संपादन क्षेत्र:-** **२७.८७ चौ.मी.**

**संपादनाचं प्रयोजन :-** **शेगांव तिर्थक्षेत्र विकास आराखडया अंतर्गत रस्ता रुंदी करण व मजबुती करणा करीता**

## अनुसूची-२

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव:-** शेगांव विकास आराखडा

**प्रकल्पकार्याचे वर्णन:-** तिर्थक्षेत्र शेगांव विकास आराखडयाअंतर्गत मौ. शेगांव ता. शेगांव जि. बुलडाणा येथील परिक्रमा मार्गाचे रुंदीकरण व मजबूतीकरणाचे कामा करीता.

**समाजाला मिळणारे लाभ :-** या प्रकल्पामुळे तिर्थक्षेत्र शेगांव येथे येणा-या भाविकभक्तांना रस्ता रुंदीकरणामुळे जाणे येणे सोईचे होणार आहे.

## अनुसूची-३

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गांवः- शेगांव ता.:- शेगांव, जि.:- बुलडाणा

| अनुक्रमांक | नझुल शिट नं / नगरभुमापन क्र. | अंदाजित क्षेत्र ( चौ.मी.) |
|---|---|---|
| | निरंक | |

## अनुसूची-४

( पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )

निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे अभिलेख उपविभागिय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी खामगांव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- २३/१२/ २०१९

ठिकाण :- बुलडाणा

( मुकेश चव्हाण )
उपविभागिय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी खामगांव

जिल्हाधिकारी बुलडाणा